**<u>ठळक बातम्या</u>**

- १२ जिल्हा परिषद आणि सव्वाशे पंचायत समित्यांच्या निवडणुकीसाठी अर्ज भरायचा उद्या शेवटचा दिवस

- कष्टकऱ्यांचे पालघरच्या जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन

- सोन्याचा भाव तोळ्यामागे दीड लाख रुपयांच्या वर, चांदीच्या दरानं ओलांडली करांशिवाय ३ लाखांची पातळी

**आणि**

- जागतिक परिस्थितीमुळं १ हजार अंकांहून जास्त घसरण नोंदवून सेन्सेक्स ८२ हजारांच्या जवळ

**<><><><><>**

राज्यातल्या १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांसाठीच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत उद्या संपणार आहे. १६ जानेवारीला अर्ज भरायला सुरुवात झाली होती. २२ जानेवारीला अर्जांची छाननी होईल आणि २७ जानेवारीपर्यंत अर्ज मागे घेता येतील.  याच दिवशी अंतिम उमेदवार यादी जाहीर होईल आणि मतदान चिन्ह वाटप होईल. ३ तारखेला मध्यरात्रीपर्यंत उमेदवारांना प्रचार करता येईल आणि ५ फेब्रुवारीला सकाळी साडे ७ ते साडे ५ दरम्यान मतदान होईल. प्रत्येक मतदाराला जिल्हा परिषदेसाठी १ आणि पंचायत समितीच्या गणासाठी एक अशी दोन मतं द्यावी लागतील.

**<><><><><>**

छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषद निवडणुकीसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष, वंचित बहुजन आघाडी आणि काँग्रेस यांच्यात युतीची चर्चा सुरू असल्याचं अंबादास दानवे यांनी सांगितलं. ते छत्रपती संभाजीनगर इथं वार्ताहरांशी बोलत होते. जिल्ह्यातले ६३ जिल्हा परिषद गट आणि १२६ गणांसाठी तिन्ही पक्ष एकत्र लढणार असून आतापर्यंत ५५ गट आणि ११६ गणांविषयी चर्चा झाली आहे. ही चर्चा सकारात्मक झाली

असून नऊ पैकी सात तालुक्यांसाठी तिन्ही पक्षांचं एकमत झाल्याचं त्यांनी सांगितलं. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानेही या आघाडीत यावं असं आवाहन दानवे यांनी केलं.

छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषद तसंच पंचायत समितीची निवडणूक, सिल्लोड तालुक्यात शिवसेना स्वबळावर लढवणार असल्याचं, सिल्लोडचे आमदार अब्दुल सत्तार यांनी सांगितलं आहे. ते आज छत्रपती संभाजीनगर इथं माध्यमांशी बोलत होते.

**<><><><><>**

चंद्रपूर महानगरपालिकेत काँग्रेसचीच सत्ता येणार असून त्यासाठीचं आवश्यक संख्याबळ जमवल्याचं काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार यांनी आज सांगितलं. चंद्रपुरात काँग्रेसची सत्ता स्थापन करणं ही आपली प्राथमिकता आहे. नगरसेवकांची फोडाफोडी करण्याची कोणालाही संधी मिळणार नाही. महापौर काँग्रेसचाच होईल, असं वडेट्टीवार म्हणाले.

- **- होल्ड /बाईट /वडेट्टीवार - - -**

- **<><><><><>**

स्वित्झर्लंडमध्ये दावोस इथं आयोजित जागतिक आर्थिक परिषदेत काल पहिल्याच दिवशी महाराष्ट्र राज्य सरकारनं विविध कंपन्याबरोबर विक्रमी साडेचौदा लाख कोटी रुपयांच्या गुंतवणूक करारांवर स्वाक्षऱ्या केल्या. याअंतर्गत स्वाक्षरी केलेल्या १९ सामंजस्य करारांमुळे विविध क्षेत्रांमध्ये १५ लाखांहून अधिक रोजगाराच्या संधी निर्माण होण्याचा अंदाज आहे.

**<><><><><>**

धनगर आरक्षण प्रश्नी उद्या मुंबईत आझाद मैदानावर आंदोलन करण्याकरता परवानगी मागणाऱ्या याचिकेवर तातडीनं सुनावणी घ्यायला मुंबई उच्च न्यायालयानं आज नकार दिला.

गेल्या वर्षी मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे यांनी आझाद मैदानावर केलेल्या आंदोलनात उपोषणादरम्यान मुंबईत निर्माण झालेल्या परिस्थितीचा उल्लेख करत न्यायालयानं सांगितलं की, त्यांनीही एका दिवसासाठी परवानगी मागितली होती, मात्र ते सहा दिवस थांबून राहिले. आंदोलकांनी व्यापलेला भाग त्यांनी जाण्यापूर्वी स्वच्छ करावा असं सांगितलेलं असतानाही तो स्वच्छ न करता ते निघून गेले आणि महानगरपालिकेला ते

काम करावं लागलं. त्यामुळे या याचिकेवर तातडीनं सुनावणी होणार नाही, आंदोलन कधीही करता येईल, असं न्यायालयानं याचिकाकर्त्यांना सुनावलं.

या याचिकेवर येत्या २८ तारखेला सुनावणी होईल.

**<><><><><>**

कुख्यात गुन्हेगार आणि १९९३च्या मुंबई बॉम्बस्फोट प्रकरणातला दोषी अबू सालेम याला पॅरोल देण्याला सरकारनं विरोध केला आहे. गेल्या नोव्हेंबरमधे सालेमने आपल्या भावाच्या निधनानंतर पॅरोलची मागणी मुंबई उच्च न्यायालयाकडे केली होती. मात्र पॅरोल मिळाल्यावर तो पुन्हा फरार होऊ शकतो, आणि पोर्तुगालमधून त्याचं हस्तांतरण झालं असल्याने भारत सरकार पोर्तुगालला उत्तरदायी आहे. सालेम फरार झाल्यास उभय देशातल्या संबंधांना आणि समाजाला धोका उत्पन्न होऊ शकतो म्हणून त्याला रजा देऊ नये असा युक्तिवाद राज्य सरकार आणि सीबीआयने केला आहे. न्यायमूर्ती ए. एस. गडकरी आणि न्यायमूर्ती श्याम चांडक यांनी पुढची सुनावणी येत्या २८ जानेवारीला ठेवली आहे.

**<><><><><>**

पालघर जिल्ह्यात होणारे वाढवण आणि जिंदाल बंदर रद्द करावे, प्रलंबित वनपट्टे धारकाच्या नावावर करावेत, स्मार्ट मीटरची सक्ती बंद करावी, अशा विविध १२ मागण्यांसाठी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष आणि किसान मोर्चाने काढलेला लाँग मार्च पालघर जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. या ठिकाणी मोर्चाकऱ्यांनी ठिय्या आंदोलन सुरू केलं आहे.

डहाणूचे आमदार विनोद निकोले, आणि किसान सभेचे राष्ट्रीय अध्यक्ष अशोक ढवळे हे या मोर्चाचे नेतृत्व करत आहेत.

**<><><><><>**

मुंबईच्या सराफा बाजारात आज सोन्याचे दर तोळ्यामागे करांसह दीड लाख रुपयांच्या पलीकडे गेले तर चांदीनं किलोमागे करांशिवाय ३ लाखांचा टप्पा ओलांडला.

सोनं आज तोळ्यामागे सुमारे ३ हजार ४०० रुपयांनी महाग झाल्यानं एक तोळा २४ कॅरेट सोन्याच्या किंमत १ लाख ५१ हजार ८०० रुपयांच्या पलीकडे गेली. २२ कॅरेट सोन्यासाठी १ लाख ४८ हजार रुपयांपेक्षा अधिक रक्कम मोजावी लागत होते. दिवसभरात

चांदी किलोमागे १५ हजार ३७० रुपयांनी महाग झाली आणि करांसह एक किलो चांदीसाठी ३ लाख १८ हजार ६२५ रुपये मोजावे लागत होते.

<><><><><>

अमेरिकेकडून वारंवार दिली जाणारी आयात शुल्क वाढीची भिती, कमकुवत होणारा रुपया यासारख्या कारणांमुळं देशातल्या शेअर बाजारात आज मोठी घसरण झाली.

दिवसअखेर सेन्सेक्स १ हजार ६६ अंकांनी घसरुन ८३ हजारांच्या खाली जाऊन ८२ हजार १८० अंकांवर बंद झाला. व्यवहारा दरम्यान हा निर्देशांक ८२ हजारांच्या पातळीखाली जाण्याचीही भिती निर्माण झाली होती. निफ्टी ३५३ अंकांची घट नोंदवून २५ हजार २३२ अंकांवर स्थिरावला. जागतिक बाजारपेठेतली घसरण, मोठ्या कंपन्यांच्या समभागांच्या घसरलेल्या किंमती यामुळंही बाजारात घसरण दिसून आली.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून प्रगती व्यासपीठामुळं यवतमाळ जिल्ह्यातल्या बेंबळा सिंचन प्रकल्पाला गती मिळाली. याविषयी अधिक जाणून घेऊ आमच्या प्रतिनिधीकडून......

**<u>व्हीसी</u>**

*(प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत राबवण्यात आलेला यवतमाळ जिल्ह्यातला बेंबळा सिंचन प्रकल्प हा विदर्भातल्या कृषी क्षेत्राला मजबूत करण्याच्या उद्देशाने उभारलेला एक प्रमुख सिंचन प्रकल्प आहे. २ एप्रिल २००७ रोजी २ हजार ६८५ कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या या प्रकल्पाला मंजुरी मिळाली. मात्र हा प्रकल्प पूर्ण होण्यात अनेक अडचणी येत राहिल्या. त्यामुळं २५ ऑक्टोबर २०२३ रोजी प्रधानमंत्र्यांनी प्रगती व्यासपीठाच्या अंतर्गत या प्रकल्पाचा आढावा घेतला. आढाव्यानंतर त्यांनी संबंधित केंद्रीय मंत्रालयं, राज्य सरकार यांना समस्यांचं निराकरण करण्याचे निर्देश दिले. त्या अनुषंगाने भूसंपादन प्रक्रिया जलद करणं, सुधारित नियोजन आणि उर्वरित कालव्याचं काम पूर्ण करण्यात आलं. अखेर गेल्यावर्षी ३० जून रोजी हा प्रकल्प कार्यान्वित झाला.)*

<><><><><>

महिला प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेत आज गुजरातमधे वडोदरा इथं दिल्ली कॅपिटल्स आणि मुंबई इंडियन्स यांच्यात सामना होत आहे. दिल्ली नं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे. थोड्याच वेळात, म्हणजे साडे सात वाजता सामना सुरु होईल.

<><><><>

गडचिरोली जिल्ह्यात आज आलापल्ली-आष्टी महामार्गावर दिना नदीच्या पुलावरुन कार नदीत कोसळल्यानं दोन जण ठार, तर तीन जण गंभीर जखमी झाले. जखमींना उपचारासाठी चंद्रपूरला नेलं आहे.

हे सर्वजण अहेरीजवळच्या नागेपल्ली इथून एका नातेवाईकाचा अंत्यविधी आटोपून परत निघाले असताना चालकाचे नियंत्रण सुटल्यानं कार नदीत कोसळली.

<><><><>

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयातर्फे दिले जाणारे, 'महाकवी कालिदास, संस्कृतव्रती राष्ट्रीय पुरस्कार' जाहीर झाले आहेत. आंतरराष्ट्रीय श्रेणीत सरोजा भाटे आणि माधव देशपांडे यांची निवड झाली आहे. तर ज्येष्ठ श्रेणीत कालुरी हनुमंत राव, कृष्णकांत शर्मा यांना गौरविलं जाणार आहे. वीरनारायण पांडुरंगी आणि सचिन कठाळे यांचा युवा विद्वान म्हणून गौरव होईल. आंतरराष्ट्रीय आणि ज्येष्ठ विद्वानांना, प्रत्येकी ५० हजार तर, युवा विद्वानांना, २५ हजार रुपये रोख पुरस्कार दिला जाणार आहे.

<><><><>

राज्यातल्या ९ प्रमुख कापूस उत्पादक जिल्ह्यातल्या सुमारे ५ हजार महिला शेतकऱ्यांना अधिक सक्षम बनवून शाश्वत शेतीला चालना देण्यासाठी गोदरेज अग्रोवेट कंपनीनं ग्रामीण उपजीविका अभियानाबरोबर प्रारंभिक करार केला आहे. या उपक्रमाचा लाभ नागपूर, अमरावती, यवतमाळ, वाशीम, परभणी, जळगाव, बीड, अकोला आणि नांदेड या जिल्ह्यातल्या महिला शेतकऱ्यांना मिळणार आहे.

<><><><>

येत्या दोन दिवसात मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. राज्यात इतरत्र हवामान कोरडं राहील.

//<><><><>//